UPSC Fever

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्सः२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०१६

**अधिसूचना क्रमांक : एसएसएम-०५१६/सीआर-२१/२०१६/तीन** **जाहिरात क्रमांक ४४/२०१६**

जाहिरात क्रमांक - १४५/२०१५, दिनांक २३ डिसेंबर, २०१५ नुसार राज्य शासनाच्या सेवेतील विविध पदांवरील / सेवांमधील नियुक्तीकरिता आयोगामार्फत दिनांक १० एप्रिल, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या **राज्य सेवा पूर्व परीक्षा-२०१६** च्या निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची **राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१६ दिनांक २४, २५ व २६ सप्टेंबर, २०१६** रोजी **औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे** या केंद्रावर घेण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :- एकूण १३५ पदे**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(१) उप जिल्हाधिकारी, गट-अ (एकूण ५ पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | २ | ३ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | २ | २ | ४ |
| **महिला** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(२) पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ (एकूण ३० पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १ | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | २ | २८ | ३० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १ | -- | -- | १ | -- | -- | -- | -- | २ | १७ | १९ |
| **महिला** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | ९ | ९ |
| **खेळाडू** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(३) सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | ३ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १ | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | ३ | ६ |
| **(४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी/गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण ६ पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | २ | ४ | ६ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | २ | ३ | ५ |
| **महिला** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| **(५) सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ, (एकूण ८ पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | १ | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | ५ | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | १ | -- | -- | १ | -- | १ | -- | ३ | ३ | ६ |
| **महिला** | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | २ |
| **(६) मुख्याधिकारी, नगरपालिका/नगर परिषद, गट अ (एकूण २ पदे)** | | | | | | | | | | | |
| **पदसंख्या** | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | २ |

UPSC Fever

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (७) तहसिलदार, गट-अ (एकूण १९ पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | ३ | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | ५ | १४ | १९ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | ४ | ८ | १२ |
| महिला | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ५ | ६ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| विकलांग | एकूण पद १ - श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |
| (८) उप शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-ब (प्रशासन शाखा) (एकूण १२ पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | २ | १ | १ | -- | -- | -- | २ | -- | ६ | ६ | १२ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | २ | १ | १ | -- | -- | -- | १ | -- | ५ | ३ | ८ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | २ | ३ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (९) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब (एकूण १ पद) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | १* | -- | १ | -- | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | -- | १ |
| (१०) कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण २० पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | १ | -- | -- | १ | ७ | -- | १० | १० | २० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | -- | -- | १ | ५ | -- | ८ | ६ | १४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | -- | २ | ३ | ५ |
| खेळाडू | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| विकलांग | एकूण पद - १ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायू - १ पद | | | | | | | | | | |
| (११) सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण ५ पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | ३ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | २ | २ | ४ |
| महिला | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (१२) सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब (एकूण ८ पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | ३ | -- | -- | -- | -- | १ | -- | ४ | ४ | ८ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | २ | -- | -- | -- | -- | १ | -- | ३ | ३ | ६ |
| महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | २ |
| (१३) उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट ब (एकूण १ पद) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| (१४) उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण २ पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | २ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | -- | १ | १ | २ |
| (१५) नायब तहसिलदार, गट-ब (एकूण १० पदे) | | | | | | | | | | | |
| पदसंख्या | -- | ३ | -- | -- | -- | १ | -- | १ | ५ | ५ | १० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे :- | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | -- | २ | -- | -- | -- | १ | -- | १ | ४ | ३ | ७ |
| महिला | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | २ | ३ |

* अनुशेषाचे पद

UPSC Fever

२.१ **वर** नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणाच्या शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिलांसाठीचे आरक्षणशासनानेयासंदर्भातवेळोवेळीनिर्गमितकेलेल्याआदेशानुसाररहील.

२.३ महिलांसाठीआरक्षितपदांकरीतादावा करणा-या उमेदवारांनीमहिला आरक्षणाचालाभ घ्यावयाचाअसल्यासत्यांनीअर्जामध्ये न चुकतामहाराष्ट्राचेअधिवासी (Domiciled) असल्याबाबत, महिला आरक्षणाचालाभ घेऊ इच्छित असल्याबाबततसेच नॉन क्रीमीलेयरमध्ये मोडत असल्याबाबतस्पष्टपणेदावा करणे आवश्यकआहे.

२.४ प्राविण्यप्राप्तखेळाडूआरक्षणासंदर्भातशासननिर्णय, शालेयशिक्षणव क्रीडाविभाग, क्रमांकराक्रीधो२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे२, दिनांक१ जुलै, २०१६ आणि तदनंतरशासनानेयासंदर्भातवेळोवेळीनिर्गमितकेलेल्याआदेशानुसारकार्यवाहीकरण्यातयेईल.

२.५ वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

२.६ गुणवत्ताधारकमात्र खेळाडू आरक्षणाचादावा करणा-या उमेदवारांनीत्यांचीप्रमाणपत्रे ज्या गटातील (गट-अ किंवा गट-ब) पदांसाठीअर्ज करीत आहेत, त्याकरीताविहित दर्जाचीअसल्याबाबतया परीक्षेसाठीअर्ज सादर करताच सक्षम प्राधिकाऱ्याकडूनखातरजमाकरुन घ्यावी तरच त्यांनागुणवत्ताधारकमात्र खेळाडूआरक्षणाचालाभ घेतायेईल.

२.७ खेळाडूंसाठीआरक्षितपदाकरितादावा करणाऱ्याउमेदवारांनीत्यांचीपात्र खेळाडू असल्याबाबतचीप्रमाणपत्रेप्रस्तुतपदांच्यामुलाखतीपूर्वीसंचालक, क्रीडाव युवक सेवा संचालनालय, पुणे किंवासक्षमप्राधिकारीयांच्याकडूनप्रमाणितकरुन घेणे आवश्यक आहे. संचालक, क्रीडायांच्याकडेकिंवासक्षम प्राधिकाऱ्याकडेप्रमाणपत्रेसादर करतानापात्रखेळाडूउमेदवारानेआपली खेळाडूविषयक **सर्व प्रमाणपत्रेएकाच वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

२.८ प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांच्या बाबतीत खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारक असणारे उमेदवारच त्या त्या पदावर गुणवत्तेनुसार शिफारशीस पात्र असतील :-

| अ.क्र क्र . | पदाचे नांव | शासन आदेश | विकलांगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त,गट-अ | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक रापोसे ३०९८/प्र.क्र.२२५/पोल-१-अ, दिनांक २४ नोव्हेंबर, १९९९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र |
| २ | सहायक संचालक,महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ) | शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक संलेको २०१०/प्र.क्र.२६६/कोषा.प्र-२, दिनांक ३ जानेवारी, २०११ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - पात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - पात्र |
| ३ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट ब | शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक इएसटी ४०९८/सीआर १५४/इएक्ससी-४, दिनांक १६ फेब्रुवारी, २००९ | (१) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी - अपात्र<br>(२) श्रवणशक्तीतील दोष - अपात्र<br>(३) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - अपात्र |

२.९ शासनाने संबंधित पदासाठी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर पदांच्या बाबतीत अंधत्व किंवा क्षीणदृष्टी, श्रवणशक्तीतील दोष तसेच चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या प्रकारची विकलांगता असलेले उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील.

२.१० विकलांग व्यक्तींसाठी आरक्षित पदासाठी अथवा विकलांग व्यक्तींसाठी असलेल्या वयोमर्यादेचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीदवारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील विकलांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२.११ विकलांग उमेदवारासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.१२ विकलांग व्यक्तींसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे; याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.१३ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.१४ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर मागासवर्गीयासाठी विहित केलेली वयोमर्यादा, परीक्षा शुल्क तसेच इतर पात्रता विषयक अटी/निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

२.१५ मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटिशन क्रमांक ४२३३/२०१६ प्रकरणी होणा-या निर्णयाच्या अधीन राहून प्रस्तुत प्रकरणी पदभरतीची कार्यवाही करण्यात येत आहे.

२.१६ विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत यासंदर्भात संबंधित उमेदवाराने आयोगास स्वतंत्रपणे पत्राद्वारे विनंती करणे आवश्यक आहे.

२.१७ कक्ष अधिकारी गट-ब हे पद वगळता इतर पदांकरिता "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" लागू आहेत.

**३. वेतनश्रेणी :-**

**३.१** गट -अ च्या पदांकरिता रुपये १५,६००-३९,१०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**३.२** गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८०० व नियमांनुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**४. पात्रता :-**

**४.१** भारतीय नागरिकत्व.

**४.२ वयोमर्यादा :-**

**४.२.१** दिनांक **१** एप्रिल, **२०१६** रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२.२** उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(२) पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(३) माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम.
(४) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत वयाच्या ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.
(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

४.३.१ उपलब्ध पदसंख्येतील सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ, तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी , गट-ब ही दोन पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.३.२ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा
(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा
(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा
(४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा
(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

४.३.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी शाखेतील किंवा भौतिक शास्त्र व गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी.

४.३.४ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत परीक्षेस पात्र असतील, परंतु राज्य सेवा मुख्य परीक्षा- २०१६ च्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१६ करिता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४.३.५ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

४.३.६ सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

**४.४ शारीरिक मोजमापे/अर्हता :-**

**वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत खालील पदांकरीता त्यांच्या पदनामासमोर दर्शविल्याप्रमाणे उमेदवारांची शारीरिक मोजमापे/अर्हता असणे आवश्यक आहे :-**

४.४.१ **पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट अ -**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| (१) **उंची** - १६५ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**)<br>(२) **छाती - न फुगविता** ८४ **से.मी.**,<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक** | **उंची** - १५७ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**) |

४.४.२ **अधीक्षक, गट-अ व उप अधिक्षक, गट-ब राज्य उत्पादन शुल्क -**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| (१) **उंची** - १६५ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**)<br>(२) **छाती - न फुगविता** ७९ **से.मी.**,<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक** | **उंची** - १५५ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**) |

४.४.३ **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब -**

| **पुरुष उमेदवारांकरिता** | **महिला उमेदवारांकरिता** |
|---|---|
| (१) **उंची** - १६३ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**)<br>(२) **छाती - न फुगविता** ७९ **से.मी.** (**कमीत कमी**),<br>(३) **फुगविण्याची क्षमता - किमान** ५ **से.मी. आवश्यक**,<br>(४) **चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.** | (१) **उंची** - १६३ **सें.मी.** (**अनवाणी**) (**कमीत कमी**)<br>(२) **चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी असावी आणि रंगांधळेपणा नसावा.** |

४.५ उपरोक्त परिच्छेद क्रमांक ४.३.२, ४.३.३ व ४.४ मध्ये नमूद केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे व शैक्षणिक अर्हता (लागू असेल त्याप्रमाणे) अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**५. सेवाप्रवेशोत्तर शर्ती :-**

**५.१** नियुक्त झालेल्या व्यक्तीस खालील परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील :-

**५.१.१** जेथे प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहित केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा

**५.१.२** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**५.१.३** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

UPSC Fever

**५.२** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक [illegible], दिनांक २४ एप्रिल, २०१५ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार परिवीक्षाधीन नियुक्तीवर रुजू होणा-या उमेदवारांस ठराविक रकमेचे बंधपत्र (Bond) देणे आवश्यक राहील.

**५.३** महाराष्ट्र नागरी सेवा (महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या राज्य नागरी सेवा परीक्षेदवारे गट-"अ" आणि गट-"ब" (राजपत्रित), या पदाकरीता निवड होऊन सरळसेवेने नियुक्त होणा-या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उमेदवारांची सेवा ज्येष्ठता निश्चित करणे) नियम, २०१५ नुसार, निवड झालेल्या उमेदवारांची संबंधित संवर्गातील परस्पर सेवा ज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

**६. शुल्क : ६.१** :- अमागास - **रु. ५२३/-** ६.२ :- मागासवर्गीय - रु. **३२३/-**

**७. परीक्षेचे टप्पे - दोन**

(१) लेखी परीक्षा - ८०० गुण (२) मुलाखत गुण - १०० गुण

**८. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**८.१** राज्य सेवा पूर्व परीक्षा २०१६ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि पूर्व परीक्षेच्या जाहिरातीत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची **दिनांक २० ऑगस्ट, २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी पूर्तता करणा-या उमदेवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**८.२** पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करताना जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत नव्हते परंतु **दिनांक २० ऑगस्ट, २०१६** रोजी किंवा त्यापूर्वी शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत, अशा उमदेवारांनी शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक ऑनलाईन पध्दतीने नोंदविणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**८.३** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवाराने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाव्दारे फक्त ऑनलाईन पध्दतीने आवश्यक माहिती सादर करणे आवश्यक राहील.

**८.४** पूर्व परीक्षेकरीता आयोगास अर्जाद्वारे सादर केलेल्या माहितीच्या आधारेच प्रस्तुत मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती ऑनलाईन पध्दतीने सादर करणे आवश्यक राहील.

**८.५** पात्रतेसंदर्भात अर्जामधील दाव्याच्या पृष्ठयर्थ मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. आवश्यक सर्व मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्यावेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल.

**९. अर्ज करण्याची पद्धत :-**

**९.१** प्रस्तुत परीक्षेसाठी माहिती फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील.

**९.२** पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ ते दिनांक २० ऑगस्ट, २०१६** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**९.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज/माहिती सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**९.४ ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच** नावाची **नोंदणी करणे व आयोगास अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक आहे**. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

**९.५** आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

**९.६** विहित पद्धतीने **आयोगास माहिती** सादर **केल्यानंतर** परीक्षा शुल्क **भरल्याशिवाय परीक्षेसाठी उमेदवारी विचारात घेतली जाणार नाही**.

**९.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

**९.७.१** मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

**९.७.२** "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर "**माझे ॲप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे**.

**९.७.३** 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर '**Unpaid**' असे लिहिलेली असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

**९.७.४** " **Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. **(अ)** ऑनलाईन पेमेंट **(ब)** नागरी सुविधा केंद्र **(क)** चलनाव्दारे

**९.७.५** क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

**९.७.६** नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन **शुल्काचा** भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

**९.७.७** चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत **शुल्काचा** भरणा केला जाऊ शकतो.

**९.७.८** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय **निवडल्यास** अर्ज/माहिती सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज/माहिती सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**९.७.९** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २० ऑगस्ट, २०१६** रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**९.७.१०** चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २२ ऑगस्ट, २०१६** पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**९.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती** (status) **अवगत होईल त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही**.

**९.८** केंद्र निवड :-

**९.८.१** परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर **उमेदवाराला** परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता "माझे खाते" मधील संबंधित **परीक्षेची** निवड करावी. त्यानंतर "केंद्र निवडा" या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्रा**ची क्षमता दर्शविली जाईल**. **केंद्राच्या**

UPSC Fever

**क्षमते**इतक्या उमेदवारांचे अर्ज यापूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

९.८.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल, तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

१०. प्रवेशप्रमाणपत्र :-

**१०.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवाराच्या प्रोफाईलदवारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**१०.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.**

**१०.३ परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसेन्स (फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे) यापैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.**

११. प्रस्तुत **अधिसूचने**मध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर **स्पर्धा परीक्षा** अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच "**परीक्षा** " या विभागातील "**राज्य सेवा परीक्षा**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व अधिसूचना अधिकृत समजण्यात येईल.

१२. प्रस्तुत परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१३. परीक्षेची अधिसूचना आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**ठिकाण : मुंबई** **सु.ह.अवताडे**
**दिनांक : ६ ऑगस्ट, २०१६.** **अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**(१) आयोगाच्या कार्यालयात,परीक्षा कक्षात,परीक्षा केंद्राच्या परिसरात,तसेच,शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**